# कारखाना - 'शिक्षणाचा'

बुटीबारी आणि हिंगण्याच्या औदयोगिक परिसराचा सहजच फेरफटका मारला, प्लॅस्टिकचा, स्टिलचा, औषधाचा असे विविध कारखाने उभारले आहेत. त्यातच काही शाळा, कॉलेजेस दिसले. मनात विचार आला; काय योग्य जागा मिळाली यांना ! कारण आपण जसे आहोत तसेच आपल्यावर लेबल लागते. म्हटलं 'अच्छा हे शिक्षणाचे कारखाने तर !' काय दुर्दैव, आजच्या कोवळया, सुकुमार, निरागस मुलांचे आणि उत्साहाने सळसळत्या तरुणांचे पण. काय, या शिक्षणाच्या कारखान्यात शालेय मुले व महाविदयालयातील तरूण यांना करखान्याचा कच्चा माल म्हणावं का? असा मनात प्रश्न उभा राहिला. मनानीच होकार दिला. म्हणूया थोडा वेळ, काय हरकत आहे? कारखान्यातून जो पक्का माल बाहेर पडतो आहे, तो कसा आहे ? इतर कारखान्यातून जसा बाहेर पडतो तसाच निर्जीव व अल्पकाळ उपयोगी, युज अ‍ॅण्ड थ्रो सारखा की अगदी वेगळा ?

म्हटलं, या शिक्षणाच्या कारखान्यात डोकावून बघावं, जिकडे पहावं, तिकडे मुल + माहिती अशीच काहीतरी प्रक्रिया होतांना दिसली. मनानी म्हटलं ठीक तर आहे, कारखान्यातून मुल माहितीच घेऊन बाहेर पडणार आहेत– मग औदयोगिक परिसरात शिक्षणाचा कारखाना चपखल बसू शकतो. पण बघा हं या कारखान्याला गुरूकुल, विदयामंदिर असं नाही म्हणता येणार ! कारण या विदयार्थ्यांना मिळते ती अल्पकाळ डोक्यात टिकणारी माहिती. ही माहिती मुलांच्या मेंदुचं कोठार बनवणार, मग या शिक्षणाच्या कारखान्यातून बाहेर पडलेला माल कुठे कुठे वापरता येईल ? येईल थोडे दिवस, इतर कारखाने उभे करतांना. विचार आला, जगात सध्या मंदी आहे. या पक्क्या मालाला उठावच नसेल तर या शिक्षणाच्या कारखान्यांच भवितव्य काय?

पक्क्या मालावर कसा शिक्का मारुन आपण बाजारात विकतो; तसेच या विदयार्थांना वेगवेगळया पदव्यांचे शिक्के मारुन ''रेडी टू यूज अ‍ॅण्ड थ्रो'' साठी जागतिक बाजारपेठेत पाठवतो. सांगा, पटते आहे नं शाळांची जागा कारखान्यांच्या रांगेत ? माफ करा ! कटू आहे, पण सत्य आहे !!

छे_! शिक्षणांच इतकं अवमुल्यन करुन चालणार नाही. पण वास्तव तर नाकारता येणार नाही. कारण गावातल्या काय आणि गावाबाहेरच्या काय, कोणच्याही शाळा, कॉलेज मधून ज्ञान दिलच जात नाही, दिली जाते ती फक्त माहिती. ज्या क्षणी शाळा व महाविद्यालयातून ज्ञान अवगत कसं करायचं हे शिकवलं जाईल त्याच दिवशी औदयोगिक परिसराच्या वसाहतीतून शाळा, कॉलेजला जागा नाकारली जाईल. कारखाने गावाबाहेर समजू शकतो, पण शाळा पण गावाबाहेर कां ? एक असाही सूर उमटतो आहे. गावातल्या मोकळ्या जागा संपल्या म्हणून शाळा शांतीच्या शोधार्थ, गावाबाहेर पडल्या . पण अजूनही गावातली अनेक मैदानं ओस पडली आहेत. त्या मैदानांवर शाळा भरण्यासाठी लोक नाखूष आहेत. का, तर शाळांचा त्रासच जास्त आहे म्हणून. तेव्हा शाळांना स्वेच्छेने नाही तर सक्तीने बाहेर पडावे लागले.

शाळा हद्दपार का झाल्या असं वाटतं. त्यांच्यात यांत्रिकता आली आणि शाळा आपोआपच कारखान्यांच्या रांगेत जाऊन बसल्या. शिक्षणाचे झालेलं हे अवमूल्यन अत्यंत दु:खद व हानीकारक आहे.

शाळा किंवा कारखान्याजवळून जातांना गोंगाट, कर्णकटू असे सारखेच आवाज ऐकू येतात. का ? शाळांमधून शांती, पावित्र्य अपेक्षित होत. तेच नाहिसं झाल. जिथे शांतीचा अभाव व गोंगाटाचा प्रभाव दिसला त्या शाळा, महाविद्यालयांची जागा MIDC तच योग्य आहे. ‘जर शाळा व महाविद्यालयातून पवित्र ज्ञान संपादन केल्या जाईल तर शाळांना देवालया प्रमाणे गौरविल्या जाईल व त्यांची जागा गावाबाहेर न राहता गावाच्या हृदय स्थानी असेल. हा सुदिन केंव्हा उगवेल याची मात्र मी आतुरतेनी वाट बघते आहे.

जेव्हा आमच्या देशातले तरूण परदेशात जाऊ लागले तेव्हा आमच्या देशातलं क्रीम बाहेर गेल म्हणून आम्ही अभिमानानं शोकगीत गायलं. आज तेच क्रीम मंदीच्या नावावर का होईना त्या, त्या देशांनी नाकारलं व आम्हाला मायदेशी धांडल पण तरीही काय आणि कुठे चुकलं, म्हणून असं झालं हेच गवसल नाही. त्या-त्या देशांनी मात्र ओळखलं. अहो! हे क्रीम नव्हतच.

आपणच चुकलो. मी मात्र माझ्या परदेशातल्या मुलाला म्हटलं ''अरे! आम्ही आमच्या देशातला कचरा बाहेर काढला, कचरा कसा आपण शेजाऱ्यांच्या घराशी लावतो तसा.'' इतर देशांना काही काळ आम्ही बनवलं, पण आता ते शहाणे झाले व नको तो माल / कचरा त्यानी आपल्या देशात परत धाडला.

तेव्हा हा कच्चा माल, पक्का माल, क्रीम, कचरा काय गोंधळ आहे हे जरा नीट समजलं तरच हा पेच सुटेल पण ज्ञानी व्हा तेंव्हाच काय चुकलं ते कळेल. कारण – ''ध्यानी तोच ज्ञानी''

ता. २३ /०६/ २००९